**राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजना सन २०१९-२० मध्ये राबविण्यासाठी रु.४००० लक्ष निधीच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देणे व निधी वितरीत करणे...**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः कृयायों-०४१९/ प्र.क्र.११३/१८/१४-अे**
मादाम कामा मार्ग, हुमात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई- ४०० ०३२
तारीख: १२ जून, २०१९

**वाचा**

१) कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्रमांक-कृयायो-०८१८/प्र.क्र.२३१/१४अे, दि. १२ सप्टेंबर, २०१८
२) वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक-अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.१ एप्रिल, २०१९
३) कृषि विभागाचे शासन पत्र क्र.-लेखानु-२०१९/प्र.क्र.२३/१९/२-अे, दि.८ एप्रिल,२०१९
४) आयुक्त कृषि यांचे पत्र क्र.जा.क्र.कयांउअ/मा.सु.संकीर्ण/२०१९-२०/गुनि-५/१४७/२०१९, दि.७ मे, २०१९.

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन दि.१२ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजना राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या कृषि यांत्रिकीकरण उप अभियानातील घटक क्रमांक-३, वैयक्तिक लाभार्थी शेतकऱ्यांना कृषि औजारे/यंत्र खरेदीसाठी अनुदान देणे व घटक क्र-४, कृषि औजारे/यंत्रे बँकाना अनुदान देणे या घटकांची अंमलबजावणी करावयाची आहे. सदर घटकांची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या कृषि यांत्रिकीकरण उप अभियानाच्या मार्गदर्शक सूचनानुसार करावयाची असून प्रत्येक वर्षी रु.५००० लक्ष निधी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे.

या योजनेसाठी सन २०१९-२० या वर्षात रु.४००० लक्ष तरतूद करण्यात आली असून वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.१ एप्रिल, २०१९ च्या परिपत्रकान्वये, सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पातील लेखा अनुदानातून दि.१ एप्रिल, २०१९ ते दि.३१ जुलै, २०१९ पर्यंत एकूण वार्षिक तरतूदीच्या १/३ निधीच्या मर्यादेत खर्च करण्यास प्रशासकीय विभागास प्राधिकृत केलेले आहे. त्यानुसार, राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजना सन २०१९-२० या वर्षात राबविण्यासाठी रु.४००० लक्ष रक्कमेच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देण्याचा सदर निधी आयुक्त, कृषि यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्या बाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णयः-**

१) सन २०१९-२० या वर्षात राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी, रू.४००० लक्ष (रु. चाळीस कोटी फक्त) निधीच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२) या शासन निर्णयान्वये, सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरीता रु.४००० लक्ष (रु. चाळीस कोटी फक्त) निधी आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BDS) वितरीत करण्यात येत आहे.

३) सदर योजनेंतर्गत मंजूर केलेला रु.४००० लक्ष निधी (रु.चाळीस कोटी फक्त ) खालील लेखाशीर्षाखाली चालू वर्षी अर्थसंकल्पीत केलेल्या तरतूदीतून खर्ची टाकावा.

मागणी क्रमांक:- डी-३
२४०१- पीक संवर्धन,
११३-कृषी अभियांत्रिकी
(००) (१८) राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजना,
(२४०१A९१३) ३३ अर्थसहाय्य.

४) या योजनेंतर्गत वितरीत करण्यात आलेला निधी केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण उप अभियानांतर्गत अनुज्ञेय बाबींवर खर्ची टाकावा तसेच, अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर PFMS प्रणालीद्वारे जमा करावी.

५) सदर योजनेंतर्गत ट्रॅक्टर या बाबीसाठी अनुसूचित जाती/जमाती, महिला, अल्प व अत्यल्प भू-धारक शेतकऱ्यांसाठी किंमतीच्या ५०% किंवा रु.१.२५ लाख कमी असेल ते आणि इतर शेतकऱ्यासाठी किंमतीच्या ४०% किंवा रु.१ लाख पैंकी कमी असेल ते या प्रमाणे अनुदान देण्यात यावे.

६) इतर बाबतीत योजनेची अंमलबजावणी करताना केंद्र पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उप अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांचे व संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयामधील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

७) सदर निधी खर्च करताना तो विहीत कार्यपद्धती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे/प्रकियाचे/वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत/C.V.C.तत्वानुसार/प्रचलित शासन निर्णय/ नियम/ परिपत्रक/ तरतदुीनुसार बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अंमलबजावणी यंत्रणांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही नियम/अधिकाराचा भंग होणार नाही याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रीय कार्यालयाची राहील.

८) राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेची क्षेत्रीय स्तरावर अंमलबजावणी करण्यासाठी संचालक (नि. व गु.नि.), कृषि आयुक्तालय, पुणे यांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन, उद्दिष्टनिहाय अंमलबजावणी विषयक सविस्तर सूचना सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना निर्गमित कराव्यात. सदर योजनेची अंमलबजावणी करताना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार महिला शेतकरी, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती शेतकरी यांच्यासाठी भौतिक/अर्थिक लक्षांक निर्धारीत करण्यात यावे.

९) सन २०१९-२० मध्ये राज्यात सदर योजनेंतर्गत वितरीत करण्यात येणाऱ्या निधीच्या आहरण व संवितरणासाठी पुढीलप्रमाणे नियंत्रण तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे -:

| अ.क्र. | स्तर | नियंत्रण अधिकारी | आहरण व संवितरण अधिकारी |
|---|---|---|---|
| १. | आयुक्तालय स्तर | आयुक्त (कृषि) कृषि आयुक्तालय, पुणे | सहाय्यक संचालक (लेखा-१) कृषी, आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. |
| २. | जिल्हास्तर | संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी. | संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयातील लेखाधिकारी. |

१०) सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.१ एप्रिल, २०१९ मधील अटींची पुर्तता करुन सदर परिपत्रकान्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

११) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१२१६१७४८३९०१ असा आहे .हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KIRAN N PATIL

Digitally signed by KIRAN N PATIL
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=657661007c4f6885bf8deae62f13606632589e592d8c18ceb9a49bfd3047
1850, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=64a3950913946fa68fe576faead463fd8ae1e3844a820d921b66367
4927a476e, ou=AGRICULTURE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
cn=KIRAN N PATIL
Date: 2019.06.12 16:43:06 +05'30'

**( डॉ. किरण पाटील )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री ( कृषि), मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.राज्यमंत्री (कृषि),मंत्रालय, मुंबई-३२
३. सर्व सन्माननीय विधी मंडळ सदस्य, द्वारा विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. सचिव (कृषि), मंत्रालय,मुंबई-३२
५. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय,महाराष्ट्रराज्य, पुणे
६. संचालक ( निविष्ठा व गुण नियंत्रण), कृषि आयुक्तालय,पुणे
७. सर्व संचालक/सह संचालक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
८. विभागीय कृषि सह संचालक (सर्व)
९. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
१०. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर (लेखा परिक्षा) /(लेखा व अनुज्ञेयता)
११. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.

१२.नियोजन विभाग (का-१४३१) मंत्रालय, मुंबई-३२
१३.वित्त विभाग ( व्यय-१ वअर्थसंकल्प - १३ ) मंत्रालय, मुंबई-३२
१४.मा.राज्यमंत्री ( कृषि ) यांचे खाजगी सचिव
१५.मा.मंत्री ( कृषि ) यांचे खाजगी सचिव
१६. निवड नस्ती (कार्यासन -४अे)